# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## मेट्रो संवादातून विद्यार्थ्यांना दिली मेट्रो प्रवासाची नवीन दिशा

## जीएच रायसोनी कॉलेजमध्ये मेट्रो अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांशी हितगुज

## स्मार्ट कार्ड, सवलती आणि प्रवाससुविधांबद्दल मार्गदर्शन



नागपूर – महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) तर्फे आयोजित 'मेट्रो संवाद' उपक्रमाअंतर्गत आज जीएच रायसोनी मॅनेजमेंट कॉलेज, सदर, नागपूर येथे एक प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण कार्यक्रम पार पडला. या संवाद सत्रात मेट्रो अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत नागपूर मेट्रोच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाची सुरुवात नागपूर मेट्रोच्या प्रवासात क्रांतिकारक ठरलेल्या 'ग्रीन मेट्रो' या संकल्पनेच्या माहितीने झाली. मेट्रो अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, नागपूर मेट्रो ही देशातील अग्रगण्य सौरऊर्जेवर चालणारी मेट्रो प्रणाली आहे, जी सर्व पर्यावरणीय नियमांचे पालन करत ऊर्जा-बचत आणि प्रदूषणमुक्त प्रवासास प्राधान्य देते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना स्मार्ट कार्ड अर्थात 'महा कार्ड' प्रणालीची सविस्तर माहिती देण्यात आली. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, स्मार्ट कार्ड वापरल्यास नियमित प्रवाशांना 10% सूट मिळते, तर विद्यार्थ्यांसाठी 30% पर्यंत विशेष सवलत उपलब्ध आहे. ही सवलत दररोज मेट्रोने कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरते. यासोबतच मेट्रोच्या QR कोड आधारित टोकन प्रणाली, व्हॉट्सअ‍ॅप तिकीट सेवा, मेट्रो मोबाईल ॲपद्वारे तिकीट बुकिंग, 'डे-पास' योजना तसेच महामेट्रोच्या वेबसाईटवर प्रवास, वेळापत्रक व सवलतींविषयी अद्ययावत माहिती कशी पाहता येते, याचे सविस्तर मार्गदर्शनही विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच नागपूर मेट्रोच्या फीडर सेवा म्हणजेच मेट्रो स्टेशनपर्यंत पोहोचण्यासाठी उपलब्ध शेअर ऑटो, ई-बस व इतर परिवहन सुलभ पर्यायांबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली, जेणेकरून मेट्रो प्रवास अधिक सोपा आणि अखंड करता येते.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते किस्से, रंजक उदाहरणे आणि थेट प्रश्नोत्तरांचे सत्र. विद्यार्थ्यांनी मेट्रोच्या कार्यपद्धती, सुरक्षा प्रणाली, सीसीटीव्ही नेटवर्क, महिलांसाठी राखीव डबे, तसेच दिव्यांग प्रवाशांसाठी असलेल्या विशेष सुविधा याबाबत उत्साहाने प्रश्न विचारले. मेट्रो अधिकाऱ्यांनी या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देताना अनेक रोचक आणि प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे माहिती अधिक परिणामकारकपणे मांडली. विद्यार्थ्यांना मेट्रोच्या विविध स्टेशन्सवरील प्रवासी सुविधा; जसे की चार्जिंग पॉइंट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्केलेटर्स आणि डिजिटल मार्गदर्शन व्यवस्था याचाही प्रत्यक्ष आढावा घेता आला, ज्यामुळे त्यांचा विश्वास अधिक दृढ झाला.

कार्यक्रमाच्या समारोपात विद्यार्थ्यांना मेट्रोचा नियमित आणि जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. त्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत, "ग्रीन नागपूरसाठी क्लीन ट्रॅव्हल" या अभियानात शहरातील इतर विद्यार्थ्यांसमवेत सक्रिय सहभाग घेण्याचे आश्वासन दिले. हा संवाद केवळ माहितीपर न राहता, विद्यार्थ्यांमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारा अनुभव ठरला. यावेळी महाविद्यालयातील शिकवृंद आणि महा मेट्रो नागपूरचे अधिकारी श्री महेश मोरोणे ( जेजीएम- मल्टी मॉडेल इंटिग्रेशन) आणि अखिलेश हळवे (सिनियर डीजीएम- कॉर्पोरेट कम्युनिकेशन) उपस्थित होते.

महामेट्रोचा उद्देश:

विद्यार्थ्यांसह नागपूरच्या नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत अशा नागपूर मेट्रोबद्दल जागरूकता निर्माण करणे, तसेच त्यांना स्मार्ट व सुरक्षित प्रवासासाठी प्रोत्साहित करणे, हाच महामेट्रोचा प्रमुख उद्देश आहे. याच दृष्टीने 'मेट्रो संवाद' हा चर्चात्मक कार्यक्रम नियमितपणे आयोजित केला जातो. या माध्यमातून मेट्रो अधिकाऱ्यांकडून प्रवाशांच्या शंका स्पष्ट केल्या जातात, त्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली जातात, तसेच मेट्रोविषयीच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला जातो.